आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ सप्टेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गणेश चतुर्थी निमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण, घरोघरी गणरायाच्या आगमनाचा आनंद

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून भाविकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा

- मॉर्गन स्टॅनले कॅपिटल इंटरनॅशनलच्या उदयोन्मुख बाजार गुंतवणूक निर्देशांकातल्या मूल्यांकनात भारताची चीनवर आघाडी

**आणि**

- पॅरालिम्पिक मध्ये भारताच्या होकातो होतोझे सेमा याला कांस्यपदक

**<><><><><>**

१४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असणाऱ्या विघ्नहर्त्या गणपती बाप्पाचं आगमन भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या आजच्या दिवशी घरोघरी आणि सार्वजनिक मंडपांमध्ये मोठ्या उत्साहात झालं. महाराष्ट्राचं वैशिष्ट्य असलेला हा अनोखा उत्सव अनुभवण्यासाठी अनेक परदेशी पर्यटकांचं आगमनही मुंबई - पुण्यात झालं आहे. दहा दिवस चालणाऱ्या या उत्सव काळात राज्यात सुमारे ११ हजार कोटी रुपयांहून अधिक व्यापार होण्याची शक्यता व्यापारी संघटनांनी व्यक्त केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशवासियांना गणेश चतुर्थीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात आज मुंबईत सव्वा दोन लाख घरगुती आणि सुमारे १२ हजार सार्वजनिक मूर्तींची मोठ्या भक्तीभावानं प्रतिष्ठापना झाली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन इथे गणरायाची प्रतिष्ठापना झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर बाप्पाच्या मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना झाली. श्री गणरायाचं आगमन आनंदाचं, समृद्धीचं पर्व घेऊन येवो, अशी सदिच्छा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. गणेशाची मनोभावे सेवा करतानाच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. तसंच पर्यावरणाची योग्य काळजी घेऊन सणवार साजरे केले जावेत, असं आवाहनही त्यांनी केलं आहे. यंदा राज्यात चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांमध्ये उत्साह आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतीभातीचं नुकसान झालं आहे, पण सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानीही आज गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना झाली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं.

**मुंबईच्या** गणेश गल्लीतल्या सुप्रसिद्ध गणेशोत्सव मंडळानं यंदा ९७ व्या वर्षात प्रवेश केला असून, नेहमीप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपत, यंदा काही महत्त्वपूर्ण उपक्रम आयोजित केले आहेत. लालबागच्या राजासह मोठ्या सार्वजनिक गणपतींच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच रांगा लागल्या आहेत. मुंबई महापालिकेनं गणेशोत्सवासाठी चौक व्यवस्था केली आहे. आयुक्त भूषण गगराणी यांनी सर्व व्यवस्थेचा आढावा घेतला आणि नागरिकांना चांगल्या सुविधा पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. गणेशोत्सवाच्या काळात मुंबई शहर आणि परिसरात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलीस दलानं ३२ पोलीस उपायुक्त, ४५ सहायक

पोलीस आयुक्त, २ हजार ४३५ पोलीस अधिकारी, १२ हजार ४२० पोलीस अंमलदार तसंच एस.आर.पी. एफ. तुकड्या, जलद प्रतिसाद पथकं, दंगल नियंत्रण पथकं असा चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

**पुण्यात** कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती आणि केसरीवाडा गणपती या पाच मानाच्या गणपतींचं ढोलताशाच्या गजरात आगमन होत आहे. **कोकणात** दाखल झालेल्या चाकरमान्यांनी लेझीम आणि ढोलपथकासह बाप्पाच्या मूर्ती घरी आणल्या. रत्नागिरी जिल्ह्यात यंदा एक लाख ६६ हजार ८६७ घरगुती गणपतींची प्रतिष्ठापना होत असून १२२ सार्वजनिक गणपती विराजमान होत आहेत. **नागपूरवासीयांचं** आराध्य दैवत असणाऱ्या श्री गणेश मंदिर टेकडी बाप्पाच्या दर्शनाला भाविकांची अलोट गर्दी उसळली आहे.

**अमरावतीमधेही** गणेशोत्सव मोठ्या भक्तिभावानं साजरा होत आहे. महानगर पालिका आणि अमरावती शहर मूर्तिकार संघटना यांनी अमरावती शहरात ७० हजार मातीच्या मूर्ती भाविकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. **वाशीम** जिल्ह्यातल्या २२५ गावांमध्ये एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवली जात आहे.

**अकोला** जिल्ह्यात पर्यावरणपूरक पद्धतीनं गणेशोत्सव साजरा करण्याचा कल दिसून येत आहे.

**धुळे** जिल्ह्यातही गणरायाचं जल्लोषात स्वागत करण्यात आलं.

**छत्रपती संभाजीनगर** मधील गणेश भक्तांनी महिला बचत गटांतल्या महिलांनी तयार केलेल्या श्री गणेशाच्या मूर्ती खरेदी करण्यासाठी चांगला प्रतिसाद दिला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बचत गटाच्या महिलांचं उत्पन्न

वाढविण्यासाठी ‘लखपती दिदी’ ही योजना सुरु केली आहे. त्यानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत ‘उमेद’ अभियानांतर्गत जिल्हाभरात १७५ हून अधिक ठिकाणी या गणेशमूर्तींची विक्रीकेंद्र उघडण्यात आली होती.

दरम्यान, **मुंबईत** मुलुंडमध्ये गणेशोत्सवाच्या तयारीदरम्यान एका हिट अँड रन अपघातात दोन कार्यकर्त्यांना चिरडण्याची दुर्दैवी घटना पहाटे चार वाजता घडली. गणेश मंडळाचे कार्यकर्ते मंडपाजवळ बॅनर लावत असताना एका भरधाव BMW मोटारीनं त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात एका कार्यकर्त्याचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा कार्यकर्ता गंभीर जखमी झाला आहे.

**<><><><><>**

आयआयटी मुंबईला गेल्या आर्थिक वर्षात संशोधन आणि विकासासाठी ७०० कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. गेल्या तीन वर्षातील हा सर्वाधिक निधी असून त्यात खाजगी संस्थांकडून मिळालेल्या निधीचे प्रमाण ३५ टक्के आहे. उर्वरित निधी हा सरकारी संस्थांकडून मिळालेला आहे. देशाला तंत्रज्ञान आणि आत्मनिर्भर करण्यासाठी आयआयटी मुंबई कटीबद्ध असल्याचं संस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

MSCI अर्थात मॉर्गन स्टॅनले कॅपिटल इंटरनॅशनलच्या EMIM अर्थात उद्योन्मुख बाजार गुंतवणूक निर्देशांकातल्या मूल्यांकनात भारतानं चीनला मागे टाकलं आहे. या निर्देशांकात भारताला २२ पूर्णांक २७ शतांश टक्के मूल्य मिळाले आहे, तर चीनची हिस्सेदारी २१ पूर्णांक ५८ शतांश टक्के आहे. या निर्देशांकातल्या समावेशाविषयी बाजार विश्लेषक चंद्रशेखर टिळक यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं…

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ सप्टेंबर २०२४ - शनिवार

**होल्ड - चंद्रशेखर टिळक**

**<><><><><>**

पॅरालिम्पिक मध्ये पुरुषांच्या क्लब थ्रो अर्थात लाठीफेकीत होकातो होतोझे सेमा याने कांस्य पदक जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. एका भुसुरुंग स्फोटातून बचावलेल्या सेमा यानं आपल्या पॅरालिम्पिक स्पर्धेतल्या आपल्या पदार्पणातच पदक जिंकल्याचा राष्ट्रपतींनी आवर्जून उल्लेख केला.

दरम्यान, पॅरीस पॅरालिम्पिकमध्ये भारतानं आतापर्यंत २७ पदकं जिंकली आहेत. यात ६ सुवर्ण, ९ रौप्य आणि १२ कांस्य पदकांचा समावेश आहे. भारताच्या पॅरालिम्पिकच्या इतिहासातली ही सर्वोत्तम कामगिरी आहे. सुवर्ण पदक विजेते तिरंदाज हरविंदर सिंग आणि धावपटू प्रीती पाल यांनी या एकाच पॅरालिम्पिकमध्ये दोन पदकं जिंकली आहेत. हे दोघे रविवारी होणाऱ्या समारोप समारोहात ध्वजवहन करणार आहेत.

यानंतर होणाऱ्या सामन्यांमध्ये धावपटू सिमरन महिलांच्या दोनशे मीटर टी १२ अंतिम फेरीत, दिलिप गावित पुरुषांच्या चारशे मीटर टी ४७ अंतिम फेरीत आणि नवदीप पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहे. पुरुषांच्या नौकानय स्पर्धेतल्या उपांत्य फेरीत यश कुमार शेवटच्या स्थानावर राहिला. तर पोहण्याच्या स्पर्धेत सुयश जाधव पहिल्या आठ स्पर्धकांमधून बाहेर पडला.

**<><><><><>**

अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या आंतरराज्य टोळीतील नऊजणांना भिवंडी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून साडे ५००किलोग्रॅमपेक्षा अधिक

वजनाचा गांजा, रोख रक्कम, मोबाईल फोन, टेम्पो असा ऐवज जप्त केला आहे. त्याची एकूण किंमत पावणे ३ कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. या सर्वांवर भिवंडीतल्या कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या टोळीनं टेम्पोला बनावट क्रमांक ओडिशातून हा गांजा आणला होता.

<><><><><>

नंदुरबार जिल्ह्यातल्या शहादा तालुक्यातल्या लांबोळा गावामधल्या दहाजणांना अतिसार सदृश्य आजाराची लागण झाली असल्याचं आढळून आलं आहे. या आजारानं बाधित एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून चारजणांवर जिल्हा सामान्य रुग्णालय तर अन्य दोन महिलांवर शहादा इथल्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

//<><><><><>//